# -: फेरनिविदा ( ७ वी वेळ ) :-

# (Tender Notice)

## दरपत्रकाबाबतच्या सुचना

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांच्या स्वमालकीचा कुलाबा येथील फ्लॅट (सदनिका) भाडयाने देणेसाठी दरपत्रके मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाची स्वमालकीची कफ परेड, कुलाबा येथे कासा ब्लॅंका अपार्टमेंटमधील (फ्लॅट क्रं.५२, १२६५ स्वे.फीट क्षेत्रफळाची ) सदनिका भाडयाने दयावयाची आहे. त्याकरीता मोहर बंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. याबाबत अटी व शर्तीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. महामंडळासोबत इच्छूक अर्जदारास /निविदाकारास कमीत कमी ११ महिन्याचा करारनामा करावा लागेल.

२. महामंडळाचे अपेक्षित भाडे मासिक रक्कम रु. १.१० लाख आहे. यापेक्षा कमी रक्कमेची निविदा/दरपत्रक ग्राहय धरले जाणार नाही.

३. दरपत्रकाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन निविदाकाराने महामंडळाच्या नेरुळ येथील कार्यालयात **दि. १८.०४.२०२३ ते दि.२८.०४.२०२३** दुपारी ४:०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचे नांवे दरपत्रक पाठवावित.

३. मोहोरबंद लिफाफ्यावर " महामंडळाच्या स्वमालकीची कफ परेड, कासा ब्लॅंका अपार्टमेंटमधील सदनिका भाडयाने देणेबाबत दरपत्रक " असे लिहिणे आवश्यक आहे. या लिफाफ्यामध्ये भाग-१ तांत्रिक व भाग-२ अतांत्रिक असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे तशा उल्लेखासह ठेवावेत. अशाप्रकारे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक सादर करावे अन्यथा दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाही.

४. दरपत्रकावर निविदाकाराची सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

५. प्राप्त दरपत्रक उघडण्याची तारीख, वेळ आपण नमुद केलेल्या E-mail पत्त्यावर महामंडळास आवश्यकता भासल्यास कळविण्यात येईल. त्यासाठी लिफाफ्यावर E-mail, पत्ता भ्रमणध्वनी क्रं. स्पष्टपणे नमुद करावा. याबाबतची जबाबदारी निविदाकाराची राहील, दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडते वेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

६. दरपत्रक सोबतच्या विहित फॉर्मसह, दरपत्रकाचे रु.१००/- (ना-परतावा) शुल्क रोखीने / डि.डि.ने भरावे लागेल. डि.डि. हा **" Maharashtra State Powerlooms Corporation Limited "** यांचे नांवे असावा.

७. यशस्वी निविदाकारास सदनिका भाडयाने देणेबाबतचे आदेश शासनाच्या मान्यतेनंतर निर्गमित करण्यात येतील.

८. कोणतेही १ अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया किंवा दरपत्रक स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा तसेच दिलेले कार्यादेश रदद करण्याचा अधिकार **" महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ "** राखून ठेवत आहे.

९. यशस्वी निविदाकारास महामंडळासोबत भाडे करारनामा करावा लागेल. करारनाम्यासाठी लागणारा सर्व खर्च निविदाकारास दयावा लागेल. तसेच अकरा महिन्यानंतर करारनामा वाढविण्याचा असल्यास सध्याच्या भाडयामध्ये १० % भाडेवाढ दयावी लागेल.

१०. सदर सदनिकेच्या भाडे करारापोटी तीन भाडे ची रक्कम अनामत रक्कम (डिपॉझिट) दयावे लागेल.

११. सदर सदनिकेचे भाडे दर महिन्याच्या १ ते ५ तारखे दरम्यान महामंडळास अदा करावे लागेल.

१२. सदरनिकेचे विज बिल, गॅस बिल हे यशस्वी निविदाकरास भरावे लागेल. सोसायटी देखभाल खर्च (Maintaince) महामंडळाकडून भरणा करण्यात येईल.

१३. सदर सदनिकेचा वापर हा फक्त राहण्याकरीता करावयाचा आहे.व्यावसायिक वापराकरीता करता येणार नाही

१४. निविदाकारास सदनिकेच्या सोसायटीच्या सर्व अटी व नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५. महामंडळाकरीता सोसायटीचे राखीव असलेले पार्कीग भाडेकरुना वापरता येईल.

१६. महामंडळाच्या परवानगीशिवाय सदनिकेमध्ये कसलेही बदल वा बांधकाम वा मोडतोड करता येणार नाही.

१७. महामंडळाच्या सदनिकेवर कोणताही मालकी हक्क वा अधिकार यशस्वी निविदाकरास/भाडेकरुस प्रस्थापित करता येणार नाही.

१८. याबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र मुंबई /नवी मुंबई हे राहील.

उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे भाग-१ तांत्रिक दरपत्रक फॉर्म अ मध्ये नमुद असेल तरच निविदाकाराच्या दरपत्रकाबाबत विचार करण्यात येईल.

## महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई-४०० ७०६.

हॅण्डलूम हवेली, १ ला मजला, साईप्रसाद कॉम्प्लेक्स, सेक्टर-८, प्लॉट नं.१७,
सारसोळे बस डेपोजवळ, नेरुळ, (पश्चिम) नवी मुंबई-४०० ७०६.

महामंडळाच्या स्वमालकीचा कुलाबा येथील प्लॅट (सदनिका) भाडयाने देणेसाठी निविदा
भाग - १ तांत्रिक दरपत्रक (फॉर्म अ)

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे / संस्थेचे नांव | |
| २ | संपूर्ण पत्ता / कार्यालय | |
| ३ | दुरध्वनी क्रं. कार्यालय | |
| | भ्रमणध्वनी क्र. | |
| | फॅक्स क्रं. | |
| | ई-मेल. | |
| ४ | निविदा प्रपत्र भरुन देण्याचा अंतिम दिनांक | **दि. १८.०४.२०२३ ते दि.२८.०४.२०२३**<br>दु. ४:०० वाजेपर्यंत |
| ५ | आयकर नोंदणी क्रं.(पॅन) | |
| ६ | वस्तू व सेवा कर (GST) क्रं. | |

९. निविदेच्या सुचनेमध्ये नमुद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

दिनांक :-
स्थळ :-

निविदाधारकाचे नांव, स्वाक्षरी व शिक्का

(**<u>सुचना</u> :-** दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरविणे) पांढरी शाई लावणे टाळावे, चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रदद करण्याचे अधिकार महामंडळाकडे राखून ठेवले आहेत.)

* * * * * *

**महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई-४०० ७०६.**

हॅण्डलूम हवेली, १ ला मजला, साईप्रसाद कॉम्प्लेक्स, सेक्टर-८, प्लॉट नं.१७,
सारसोळे बस डेपोजवळ, नेरुळ, (पश्चिम) नवी मुंबई-४०० ७०६.

महामंडळाच्या स्वमालकीचा कुलाबा येथील प्लॅट (सदनिका) भाडयाने देणेसाठी निविदा
भाग - १ तांत्रिक दरपत्रक (फॉर्म ब)

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे / संस्थेचे नांव | |
| २ | संपूर्ण पत्ता / कार्यालय | |
| ३ | दुरध्वनी क्रं. कार्यालय | |
| | भ्रमणध्वनी क्र. | |
| | फॅक्स क्रं. | |
| | ई-मेल. | |

| अ.क्रं. | तपशिल | मासिक भाडे GST सह |
|---|---|---|
| १ | महामंडळाची कुलाबा येथील कासा ब्लॅका अपार्टमेंटमधील सदनिका (क्रं. ५२ / १२६५ स्वे.फीट क्षेत्रफळ) वाहान पार्कीगसह भाडयाने देणेबाबत. | अंकी ------------------<br>अक्षरी -----------------------------<br>------------------------------------ |

दिनांक :-
स्थळ :-

निविदाधारकाचे नांव, स्वाक्षरी व शिक्का

(**सुचना :-** दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरविणे) पांढरी शाई लावणे टाळावे, अन्यथा निविदा रदद करण्याचे अधिकार महामंडळाकडे राखून ठेवले आहेत.)

* * * * * *

\\Smita\E\Smita २४.१२.१८\siddhi\Tender Notice of Office Flat